Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NBA
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 06/09/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचाच्या, आपल्या वाचाच्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## पुरुषांची भूमिका साकारणाऱ्या कमलाबाई गोखले



कमलाबाई रघुनाथराव गोखले तथा कमला कामत या भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रथम बाल स्त्री-कलाकार होत्या. त्यांनी अनेक नाटकांमध्ये पुरुषांच्या भूमिकाही साकार केल्या. ६ सप्टेंबर १९०१ रोजी कमलाबाई कामत यांचा जन्म झाला. कमलाबाई या दुर्गाबाई कामत आणि मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्‌समधील प्राध्यापक आनंद नानोसकर यांच्या कन्या होत. कमलाबाईंचे वडील उत्तम कीर्तनकार होते, तर आई दुर्गाबाई कामत यांना सतार वादनाची आवड होती. कमलाबाईंनी संवाद, संगीत आणि अभिनयाचे धडे गिरवले. संगीत नाटकांतील महत्त्वपूर्ण किर्लोस्कर कंपनी बंद पडल्याने कमलाबाई कामत यांचे पती रघुनाथराव गोखले यांनी चित्ताकर्षक नाटक मंडळीची स्थापना केली. या नाटकांमध्ये कमलाबाईंनी भूमिका साकारल्या. पुढे पतीच्या निधनानंतर त्यांना मिरजेच्या तवन्नापा चिवटे यांच्या मनोहर स्त्री संगीत मंडळी या कंपनीत काम मिळालं. सौंदर्य, आवाज, अभिनय आणि संगीत या सर्वच बाबतीत प्रवीण असलेल्या कमलाबाईंना स्त्री नाटक कंपनीत पुरुष पात्रांच्या भूमिका पदरी पडल्या.

कमलाबाईंनी 'मानापमान' मधील धैर्यधर, 'संशयकल्लोळ' मध्ये अश्विन शेठ, 'सौभद्र' मध्ये कृष्ण या प्रमुख पुरुष भूमिका शिताफीने रंगवल्या. पुरुषांनी स्त्रियांची भूमिका पार पाडण्याच्या त्या काळात प्रवाहाच्या विरुद्ध जात स्त्री कलाकाराने पुरुष पात्र रंगवणे धैर्याची बाब होती. रंगभूमीवर पुरुष पात्र साकारण्याबरोबरच कमलाबाईंनी विश्राम बेडेकर, मामा वरेरकर, प्रबोधनकार ठाकरे यांसारख्या नामवंत लेखकांच्या नाटकांमधून व्यक्तिरेखेला जिवंतपणा प्राप्त करून दिला. तब्बल २०० हून अधिक नाटकं, मूकपट त्यासोबतच कारकिर्दीत ३५ हून अधिक चित्रपटांमध्ये कमलाबाईंनी साकारलेल्या सर्वच भूमिकांमुळे त्या चित्रपट, नाटक रसिकांच्या कायमच लक्षात राहिल्या. जवळपास ४० वर्षं या क्षेत्रासाठी योगदान दिल्याबद्दल वयाच्या ७० व्या वर्षी दिलीपकुमार यांच्या हस्ते कमलाबाईंचा सत्कार करण्यात आला. कमलाबाई गोखले यांचे १८ मे १९९७ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Sep 06, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401